# कॉक्सिट मध्ये विप्रो कॅम्पस प्लेसमेंट प्रोग्रामचे आयोजन

लातूर : येथील अंबाजोगाई रोडवरील संगणकशास्त्र व माहितीतंत्रज्ञान महाविद्यालय (कॉक्सिट) येथे आय.टी. क्षेत्रामधील देशातील अग्रगण्य कंपनी विप्रो तर्फे विप्रो इंटीग्रेटेड लर्निंग प्रोग्राम (WILP) साठी सोमवार दि. 18 मार्च 2019 रोजी विप्रो कॅम्पस प्लेसमेंट प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले आहे.

या कॅम्पस मुलाखतीसाठी दहावी व बारावी परीक्षेत प्रत्येकी किमान 50 टक्के गुण तसेच बारावी मध्ये मॅथेमॅटीक्स हा विषय आवश्यक असून पदवी परिक्षेत किमान 60 टक्के गुण असणे आवश्यक आहे.

सदर कॅम्पस मुलाखतीसाठी बी.सी.ए., बी.एस्सी. (सी.एस.), बी.एस्सी. (एस.ई.), बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायंन्स / फिजिक्स / मॅथेमॅटीक्स) या अभ्यासक्रमाचे 2019 पासआऊट विद्यार्थी पात्र आहेत.

या विप्रो कंपनीच्या मुलाखतीस कॉक्सिटसह इतर महाविद्यालयातील पात्र विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. या सॉफ्टवेअर कंपनीस मोठा प्रमाणात विद्यार्थ्यांची निवड करावयाची आहे. या कॅम्पस मुलाखतीसाठी नावनोंदणी करु इच्छिणा-या विद्यार्थ्यांनी महाविद्यालय संकेतस्थळ www.tp.cocsit.org.in वर उशीरात उशीरा दि. 17 मार्च 2019 रोजी सायंकाळी 5.30 पर्यंत ऑनलाईन अर्ज भरुन नावनोंदणी करावी. अधिक माहितीसाठी ट्रेनिंग ऍण्ड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. किशोर जेवे (9823119200) यांच्याशी संपर्क साधावा. या कॅम्पस इन्टरव्यूमध्ये लातूर शहर व परीसारातील तसेच मराठवाड्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी भाग घ्यावा असे आवाहन संचालक डॉ. एम. आर. पाटील व प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे (9970763030) यांनी केले आहे.

**प्राचार्य**